निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
२६ डिसेबंर २०२५
पाने: ०४ । किंमत: २ .००
वर्ष: १५ वे । अंक: ३०१ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## 'आपल्या घरावर बॉम्ब पडल्यावर काय अवस्था होते, तशी...'

# देवराई जळून खाक झाल्यानंतर सयाजी शिंदे काय म्हणाले?



**आत्ताच एक्सपप्रेस**

**बीड/प्रतिनिधी**/ सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांच्या पुढाकारातून आणि वनविभागाच्या सहकार्यातून बीडच्या पालवन शिवारातील सह्याद्री देवराई प्रकल्पात झाडं लावण्यात आली होती. या प्रकल्पाला बुधवारी सायंकाळी भीषण आग लागली. या आगीनं क्षणात रौद्ररूप धारण केलं. झाडं, औषधी वनस्पतींची नासधूस आणि पक्षांचा होरपळून मृत्यू झाली असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. ओसाड डोंगराला हिरवागार करण्यासाठी सयाजी शिंदे यांनी अथक परिश्रम घेतले. मात्र, डोळ्यादेखत झाडांची नासधूस झाल्यामुळे सयाजी शिंदे यांनी एबीपी माझाशी बोलताना नाराजी व्यक्त केली. 'बीडमधील घडलेली घटना अत्यंत दुर्देवी आहे', असं सयाजी शिंदे म्हणाले.




गवत जाळल्यानंतर परत चांगलं उगवतं, अशी गैरसमज आहे. निसर्गाचं प्रचंड नुकसान होतं. पक्षी, सरपटणारे प्राणी, त्यांची पिल्ले, झाडं, रोपटी आगीत जळून खाक होतात. आपल्या घरावर बॉम्ब पडल्यावर काय अवस्था होते. तशी प्राण्यांच्या घरांचीही होते, असं सयाजी शिंदे म्हणाले. बीडमधील घटना अत्यंत दुर्देवी आहे. २०१७ला जिथं गवत पण उगवत नव्हतं, ओसाड जागा होती, अशा ठिकाणी झाडं उगवली. रान हिरवंगार झालं. सयाजी शिंदे फक्त निमित्त आहे, पण रान हिरवेगार करण्यामागे अनेकांचं हात आहे, असं सयाजी म्हणाले.

अत्यंत भयानक होतं हे सगळं. आपल्या घरातलंच कोणतरी जातं, अशी भावना मनात येते. झाडांना गांभीर्यांनी घ्यायला हवे. नागरिक म्हणून आपण सुधारलं पाहिजे. वन खातं आणि पोलिसांनीही याकडे लक्ष द्यायला हवे, असंही सयाजी शिंदे म्हणाले. मे - जून महिन्यांत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कलेक्टर यांनी सांगितले की, बीडमध्ये १५ लाख झाडं लावली, याची नोंद गिनीज वर्ल्ड बुकमध्ये झाली. कलेक्टरचा सत्कारही करण्यात आला. त्यांनी आता उत्तर द्यावं. कुठेही यांनी बीडमध्ये १५ लाख झाडं लावली हे सांगावं. साताऱ्याहून मी बीडला जात होतो, एक-एक झाडांची मी काळजी घेतली. आता बीडच्या कलेक्टरने सांगावं कौतुक करवून का घेतलं? १५ लाख झाडांचं हिशोब द्या, ते देऊ शकता का?, असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला.

झाडांच्या गोष्टी गांभीर्याने घ्यायला हवे. झाडांची कत्तल केल्यानंतर दुसर्या ठिकाणी आपण झाडं लावतोय का? हे पाहणं महत्त्वाचं आहे. राज्यकर्त्यांनी कसे वागावे, हे सर्वस्व त्यांचा प्रश्न आहे. तपोवन वाचलं पाहिजे. तपोवनमधील झाडांची कत्तल करणं चुकीचं आहे. आतापर्यंत २०-३० देवराई झाले आहेत. ४० पर्यंतचा आकडा आहे. जोपर्यंत मी जीवंत आहे. तोपर्यंत मला १०० देवराई तयार करायचे आहेत, असं माझं स्वप्न आहे, असंही सयाजी शिंदे म्हणाले.

# एमपीएससीच्या लढ्यात आता शरद पवारांची उडी

## पीएसआय वय सवलतीसाठी सरकारला सज्जड इशारा

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ सर्वात गंभीर बाब म्हणजे वयोमर्यादा मोजण्यासाठी १ नोव्हेंबर २०२५ ही तारीख निश्चित केली आहे. यामुळे गेल्या ३-४ वर्षांपासून तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांचे वय १-२ महिन्यांनी अधिक झाले असून ते आपोआप अपात्र ठरत आहेत.

नागपूर: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब) २०२५ च्या जाहिरातीमध्ये एकूण ६७४ पदे जाहीर झाली असून त्यात पोलीस उपनिरीक्षकांसाठी (पीएसआय) ३९२ पदांचा समावेश आहे. या परीक्षेदरम्यान वयोमर्यादा ओलांडलेल्या विद्यार्थ्यांना एकवेळची विशेष संधी देण्याची मागणी परीक्षार्थ्यांनी केली आहे. याबाबत राजकीय वर्तुळातून सरकारवर रोज दबाव वाढत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी आता एमपीएससीच्या या लढ्यात पुढे घेतली असून राज्य सरकारने वयोमर्यादा सवलत देण्यासंदर्भात सकारात्मक विचार करावा अशी मागणी केली आहे. माजी मंत्री जयंत पाटील,राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर अशा अनेक नेत्यांनीही या संदर्भात सरकारचे लक्ष वेधले आहे. त्यामुळे वयाच्या सवलतीबाबत सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे.वय सवलतीची मागणी का होत आहे ?सामान्यतः



ही जाहिरात डिसेंबर-जानेवारीत येते. त्यानंतर परीक्षा मार्च-मे महिन्यात होते. यावर्षी मात्र जाहिरात २९ जुलै २०२५ रोजी निघून परीक्षा ४ जानेवारीला होणार आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे वयोमर्यादा मोजण्यासाठी १ नोव्हेंबर २०२५ ही तारीख निश्चित केली आहे. यामुळे गेल्या ३-४ वर्षांपासून तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांचे वय १-२ महिन्यांनी अधिक झाले असून ते आपोआप अपात्र ठरत आहेत. पोलीस भरतीमध्ये २०२२-२५ दरम्यान वय ओलांडलेल्या उमेदवारांना राज्य शासनाने एकवेळची विशेष संधी दिली होती. त्या धर्तीवर आता एमपीएससी संयुक्त गट-ब (विशेषतः पीएसआय) साठीही अशा विद्यार्थ्यांना एकवेळची वयोमर्यादा सवलत देण्याचा निर्णय तत्काळ घ्यावा, अशा मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विविध लोकप्रतिनिधींकडूनही पाठवण्यात आले आहेत.

काय म्हणाले शरद पवारएमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या एका युवतीने 'संयुक्त पूर्व परीक्षा २०२५' संदर्भात वयोमर्यादेची सवलत मिळावी यासाठी गेल्या ५-६ महिन्यांपासून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत आहोत. मात्र अद्यापपर्यंत कोणतेही सकारात्मक उत्तर मिळालेले नाही, असे सांगत माझ्याकडे पुढील समस्या मांडल्या आहेत.

१) शासनाने पोलिस शिपाई भरतीसाठी वयोमर्यादा २८ वर्षांवरून ३५ वर्षांपर्यंत वाढवली आहे. मग त्याच गृह विभागांतर्गत येणाऱ्या पोलिस उपनिरीक्षक पदासाठी केवळ १ वर्षाची वयोमर्यादा सवलत देण्यास विलंब का होत आहे? त्यामुळे शासनाने पोलिस उपनिरीक्षक (झडख) पदासाठी तात्काळ १ वर्षाची वयोमर्यादा सवलत जाहीर करावी.२) जाहिरात प्रसिद्ध होण्यास ७ महिन्यांचा विलंब झाल्याने तसेच वयोमर्यादा गणनेचा दिनांक १ नोव्हेंबर २०२५ निश्चित केल्याने, काही दिवसांच्या फरकामुळे हजारो विद्यार्थ्यांची शेवटची संधी हिरावली जात आहे. त्यामुळे वयोमर्यादा गणनेचा दिनांक १ जानेवारी २०२५ ग्राह्य धरावा. वरील मागण्या पूर्णपणे रास्त असून महाराष्ट्र शासनाने याचा सकारात्मक भूमिकेतून लवकरात लवकर विचार करावा आणि विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय द्यावा.

# पलला मागे टाकत चांदी बनली जगातील तिसरी सर्वात मौल्यवान मालमत्ता

## वर्षभरात गुंतवणूकदारांना दिला सुमारे १५०ं टक्के परतावा

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ २०२५ मध्ये चांदीने सोन्यापेक्षा परतावा देण्याच्या बाबतीत सरस कामगिरी केली आहे. वर्षाच्या सुरुवातीपासून चांदीच्या किमतीत १५०% वाढ झाली आहे.

सोने आणि एनव्हीडियानंतर चांदी आता जगातील तिसरी सर्वात मौल्यवान मालमत्ता बनली असून, चांदीने आयफोन निर्मिती करणारी कंपनी पलला मागे टाकले आहे. या वर्षात चांदीच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत आहे.फ्युचर्सने प्रति औंस ७१ डॉलरचा टप्पा ओलांडल्यामुळे, चांदीने वर्षभरात गुंतवणूकदारांना जवळपास १५० टक्के परतावा दिला आहे. मंगळवारी वॉल स्ट्रीटवरील बाजार बंद झाल्यानंतर, चांदीचे बाजार भांडवल ४.०४ ट्रिलियन डॉलर होते, जे पलच्या ४.०२ ट्रिलियन डॉलरच्या मूल्यांकनापेक्षा थोडेसे जास्त आहे.

चांदीचा वापर इलेक्ट्रॉनिक्स, सौर पॅनेल आणि वैद्यकीय उपकरणांसाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे औद्योगिक मागणी आणि ईटीएफमधील मजबूत गुंतवणुकीमुळे चांदीच्या किमती उच्च पातळीवर टिकून आहेत.

सीएनबीसी टीव्ही१८ वृत्तानुसार, फेडच्या स्वतःच्या अंदाजानुसार सध्या केवळ एकच कपात अपेक्षित आहे. तरीही अनेक गुंतवणूकदारांना असा विश्वास आहे की, अमेरिकन फेडरल रिझर्व्ह २०२६ पर्यंत व्याजदरात कपात करत राहील. तिसऱ्या तिमाहीत मजबूत आर्थिक वाढ होऊनही हा आशावाद कायम आहे, जो अमेरिकन अर्थव्यवस्था अजूनही चांगली कामगिरी करत आहे, असा विश्वास दर्शवतो.वृत्तात असेही म्हटले आहे की, पुढील फेड बैठकीत अध्यक्ष जेरोम पॉवेल व्याजदर कमी करत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड




ट्रम्प यांच्या स्वस्त कर्ज उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देतील, या अपेक्षेमुळे बाजारांमध्येही उत्साह आहे.

२०२५ मध्ये चांदीने सोन्यापेक्षा परतावा देण्याच्या बाबतीत सरस कामगिरी केली आहे. वर्षाच्या सुरुवातीपासून चांदीच्या किमतीत १५०% वाढ झाली आहे, तर याच काळात स्पॉट मार्केटमध्ये (खरेदीसाठी उपलब्ध) सोन्याच्या किमतीत सुमारे ७६% वाढ झाली आहे. चांदीच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे या धातूमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.या वर्षी चांदीच्या तेजीला चालना देण्यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. अमेरिका आणि व्हेनेझुएला यांच्यातील वाढलेला तणाव, अमेरिकेत व्याजदरात आणखी कपात होण्याची शक्यता, तसेच डॉलरचे अवमूल्यन यांसारख्या कारणांमुळे चांदी आणि सोने या दोन्ही मौल्यवान धातूंची मागणी वाढली आहे.

सोन्याप्रमाणेच, चांदीनेही जवळपास चार दशकांपासून अस्थिरता आणि महागाईविरुद्ध एक प्रभावी संरक्षण म्हणून काम केले आहे. विश्लेषण असे दर्शवते की, ज्या वर्षांमध्ये देशांतर्गत शेअर बाजारांनी नकारात्मक परतावा दिला, त्या वर्षांमध्ये चांदीमुळे गुंतवणूकदारांचे पोर्टफोलिओ स्थिर राहिले.इक्विटी बाजारांनी डॉट-कॉम क्रॅश, जागतिक आर्थिक संकट, महामारीमुळे आलेली अस्थिरता आणि अलीकडील भू-राजकीय उलथापालथ यांसारखी अनेक तेजी-मंदीची चक्रे अनुभवली असली तरी, चांदीने आपले महत्त्व टिकवून ठेवले आहे.

# ठाण्याच्या बालेकिल्ल्यात शिंदे-भाजप युतीसमोर ठाकरे बंधूंचं आव्हान

**आत्ताच एक्सपप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला अशी ओळख असलेल्या ठाणे महानगरपालिकेची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारीला मतदानप्रक्रिया पार पडेल. त्यानंतर १६ जानेवारी रोजी मतमोजणी पार पडून निकाल जाहीर



केला जाईल. मुंबईला लागून असलेल्या ठाणे महानगरपालिकेची निवडणूक ही एकनाथ शिंदे यांच्यासह भाजप, ठाकरे गट, मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस अशा सर्वच पक्षांसाठी महत्त्वाची मानली जात आहे.

ठाणे महानगरपालिकेवर गेल्या ३० वर्षांपासून शिवसेनेचा भगवा फडकत आहे. शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या काळापासून ठाणे महानगरपालिका हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. केवळ १९८७ ते १९९३ या काळात ठाणे महानगरपालिकेवर काँग्रेस पक्षाची सत्ता होती. हा काळ वगळता ठाणे महानगरपालिका म्हणजे शिवसेना हे अविभाज्य समीकरण राहिले आहे. परंतु, अलीकडच्या काळात ठाण्यात भाजपची ताकदही वाढली आहे. यंदाच्या निवडणुकीत भाजपच्या स्थानिक नेत्यांकडून ठाण्यात स्वबळावर लढण्याची आग्रही मागणी वरिष्ठांकडे करण्यात आली होती. भाजपने त्यादृष्टीने गणेश नाईक यांना ठाण्यात सक्रिय केले होते. परिणामी शिंदे यांच्या शिवसेनेत काहीशी अस्वस्थता पसरली होती. परंतु, तुर्तास भाजप आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना युती करुनच ही निवडणूक लढवतील, अशी शक्यता दिसत आहे.



निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
**आत्ताच एक्सप्रेस**



## संक्षिप्त

### शहर शाखा क्रमांक १ कडून वीज बिल वसुलीचा धडाका



**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/शहर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (चडएइ) शहर शाखा क्रमांक १ अंतर्गत थकीत वीज बिल वसुलीच्या मोहिमेने वेग घेतला आहे. सध्या या शाखेत वसुलीचे काम युद्धपातळीवर सुरू असून, एकूण १२ कोटी ९८ लाख रुपयांच्या वसुलीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत या मोहिमेअंतर्गत २ कोटी १८ लाख रुपयांची विक्रमी वसुली करण्यात प्रशासनाला यश आले आहे. वाढती थकबाकी पाहता महावितरणने आता कडक पावले उचलण्यास सुरुवात केली असून, ज्या ग्राहकांकडे मोठी थकबाकी आहे, त्यांच्यावर कारवाईचे संकेत दिले आहेत. वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी नागरिकांनी थकीत बिले त्वरित भरावीत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. (छायाचित्र: किरण खानापुरे)

# जालना रेल्वे स्टेशन परिसरात अवैध जुगार व दारूचे अड्डे फोफावले; पोलिसांकडे कठोर कारवाईची मागणी

**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ जालना रेल्वे स्टेशन परिसरात अवैध जुगार आणि बेकायदेशीर दारू विक्रीचे अड्डे मोठ्या प्रमाणात फोफावल्याने कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्स व परिसरातील जागरूक नागरिकांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांना निवेदन देत तातडीने आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रेल्वे स्टेशन परिसर हा शहरातील अत्यंत महत्त्वाचा व गजबजलेला भाग असून येथे दररोज हजारो प्रवासी, महिला, विद्यार्थी व नागरिकांची वर्दळ असते. मात्र स्टेशनजवळील जुन्या नगरपालिका जमिनीवर काही समाजकंटकांनी बेकायदेशीर अतिक्रमण करून जुगाराचे अड्डे सुरू केले आहेत. तसेच रस्त्यालगतच्या तात्पुरत्या झोपड्या व स्टॉल्समधून देशी दारूची अवैध विक्री होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



या बेकायदेशीर कारवायांमुळे परिसरात वारंवार भांडणे, हल्ले, चोऱ्या तसेच इतर गंभीर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या १० ते १५ दिवसांपासून परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून जुगार, दारू विक्री, खंडणी व धमक्यांमध्ये एक सक्रिय टोळी गुंतलेली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

निवेदनात अलीकडील एका घटनेचा उल्लेख करण्यात आला असून, अवैध जुगाराच्या अड्ड्याजवळ शेख अहमद शेख या रिक्षाचालकावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या घटनेनंतर काही काळ दंगलीसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे रहिवासी, रिक्षाचालक, हमाल, छोटे व्यापारी, महिला व विद्यार्थ्यांमध्ये भीती आणि असुरक्षितता अधिकच वाढली आहे.

धार्मिकदृष्ट्याही हा परिसर संवेदनशील असून जवळच मशिदी व मंदिरे आहेत. नरिमण नगर, सोनल नगर, रहीम नगर व गुलजार नगर येथील रहिवाशांनी सुरू असलेल्या अवैध कारवायांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

फेडरेशनने असा आरोप केला आहे की, या सर्व कारवायांचा सूत्रधार एक सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर गेल्या १५ वर्षांत अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे पोलिसांनी नगरपालिका प्रशासनाच्या सहकार्याने समन्वय साधत सातत्यपूर्ण कारवाई करावी, अन्यथा मोठी अनुचित घटना घडण्याची शक्यता असल्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. रेल्वे स्टेशन परिसरातून अवैध जुगार व दारूचे जाळे उद्धस्त करून महिला, विद्यार्थी व सामान्य नागरिकांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या निवेदनावर शेख इस्माईल, मोहम्मद कासिम, अब्दुल वाहिद, फिरोज अली, अयुब खान, रफीक कुरेशी, सोहेल, नदवी मौलाना, फहीम नदवी, अता मोहम्मद बक्षी, इब्राहिम शेख, शेख अकबर, परवेझ जागीरदार, शेख वाजेद यांच्यासह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ‘महा पोलीस मित्र संघ’मध्ये प्रवेशासाठी युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; अंबड तालुक्यात नवीन पदाधिकाऱ्यांची निवड

**आत्ताच एक्स्प्रेस**

**अंबड (प्रतिनिधी)** सामाजिक बांधिलकीची जोपासना आणि पोलीस प्रशासनाला सहकार्याचा हात देण्यासाठी कार्यरत असलेल्या ‘महा पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य’ या संघटनेबाबत जालना जिल्ह्यात सध्या प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळत आहे. संघटनेत सहभागी होण्यासाठी युवकांमध्ये अक्षरशः रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र असून, अंबड तालुक्यात संघटनेच्या विस्तारासाठी दोन महत्त्वपूर्ण नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

महा पोलीस मित्र संघाच्या संस्थापक अध्यक्षा सौ. अनिता लष्करे, संस्थापक उपाध्यक्ष लक्ष्मण पवार आणि संपर्क प्रमुख रमेश बी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात संघटनेचे जाळे विस्तारले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, अंबड तालुका अध्यक्ष राजेंद्र मोताळे यांनी तालुक्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी नवीन नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

नूतन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती तालुक्यातील सक्रिय कार्यकर्त्यांना संधी देत खालील पदाधिकाऱ्यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे:सचिन कृष्णा कवडे: अंबड शहर तालुका उपाध्यक्ष,संदीप रमेश गोरे: अंबड शहर तालुका सचिव या दोन्ही नूतन पदाधिकाऱ्यांना नुकतेच अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना तालुका अध्यक्ष राजेंद्र मोताळे यांनी सांगितले की, समाजातील जबाबदार नागरिकांना एकत्र आणून पोलीस प्रशासनास मदत करणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. येत्या काळात तालुक्यातील प्रत्येक सर्कलमध्ये सक्षम सदस्यांची निवड करून टीम अधिक सक्रिय केली जाईल.



प्रशासनाला मिळणार बळ

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अहोरात्र कष्ट करत असतात. अशा वेळी 'पोलीस मित्र' म्हणून सामान्य नागरिकांनी त्यांना सहकार्य केल्यास गुन्हेगारी रोखण्यास आणि शांतता प्रस्थापित करण्यास मोठी मदत होते. हीच भावना मनात ठेवून अंबड तालुक्यातील युवक मोठ्या संख्येने या चळवळीशी जोडले जात आहेत.

नूतन नियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या निवडीमुळे अंबड परिसरात महा पोलीस मित्र संघाचे कार्य अधिक गतिमान आणि प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.


### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **किरण पांडुरंग काळे रा. वडीगोद्री ता.अंबड** जि. जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | **किरण पांडुरंग काळे** | **स्वतः** | २२/०५/१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२२/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **सुभद्रा अंबुजी कुंडकर रा. जामखेड ता. अंबड** जि. जालना यांनी यांच्या नात च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | **सुभद्रा अंबुजी कुंडकर** | **स्वतः** | ०१/०६/१९६९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# अंबड नगरपरिषद निवडणूक २०२५: भाजपचा दणदणीत विजय!

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (गणेश सपकाळ)** जालना जिल्ह्यातील अंबड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये भारतीय जनता पार्टीने आपले वर्चस्व सिद्ध करत ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. या विजयामुळे अंबड शहरात भाजप कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला.

**सविताताई सौरभ कुलकर्णी आणि उज्वल देविदास कुचे मोठ्या मताधिक्याने विजयी**

प्रमुख विजयी उमेदवार आणि आकडेवारी:

सविताताई सौरभ कुलकर्णी (प्रभाग २): ११५५ मते मिळवून दणदणीत विजय.

उज्वल देविदास कुचे: १०९६ मते मिळवून प्रतिस्पर्ध्यांचा पराभव.

नगराध्यक्ष पद: सौ. देवयानीताई केदार कुलकर्णी यांनी नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत विजय मिळवत भाजपची सत्ता प्रस्थापित केली.

निवडणुकीचे पक्षनिहाय बलाबल:

आमदार नारायण कुचे यांच्या नेतृत्वाखाली भाजपने ही निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढवली होती. एकूण निकाल खालीलप्रमाणे राहिला:

भाजप: १४ उमेदवार विजयी.

राष्ट्रीय समाज पक्ष (रासप): २ उमेदवार विजयी.

एकूण युती: ~~नगरपरिषदेत भाजप आणि रासपची~~ एकूण १६ जागांसह स्पष्ट बहुमताकडे वाटचाल.



हा विजय जनतेच्या विश्वासाचा आहे. अंबड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून नागरिकांच्या अपेक्षांवर निश्चितपणे खरे उतरू. - सविताताई सौरभ कुलकर्णी (नवनिर्वाचित नगरसेविका)

**आमदार नारायण कुचे यांची प्रभावी रणनीती**

बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे यांनी या निवडणुकीची सर्व सूत्रे स्वतः च्या हाती घेतली होती.

त्यांच्या संघटन कौशल्यामुळे आणि अचूक रणनीतीमुळे भाजपला हे यश मिळाले असल्याचे बोलले जात आहे. या विजयामुळे आगामी काळात शहराच्या विकासकामांना मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### मिशन हॉस्पिटल क्राइस्ट चर्चमध्ये ख्रिसमसचा उत्साह

**आत्ताच एक्सप्रेस/मिरज/ प्रतिनिधी**/ संपूर्ण जगभरात प्रभू येशू ख्रिस्त यांचा जन्मोत्सव अर्थात 'ख्रिसमस' मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. या सणाचे औचित्य साधून स्थानिक मिशन हॉस्पिटलमधील ऐतिहासिक 'क्राइस्ट चर्च' येथे विशेष प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ख्रिश्चन बांधवांसोबतच इतर सर्व समाजातील नागरिकांनी या प्रार्थनेत सहभाग नोंदवत सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवले. सकाळपासूनच चर्चचा परिसर आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांनी सजवण्यात आला होता. पारंपरिक कॅरोल्स आणि भजनांनी वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते. प्रार्थनेदरम्यान प्रभू येशूंच्या शांती आणि प्रेमाचा संदेश देण्यात आला. मिशन हॉस्पिटलशी संबंधित डॉक्टर, कर्मचारी आणि शहरातील मान्यवरांनी यावेळी एकमेकांना ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या.ख्रिसमस हा केवळ एका धर्माचा सण नसून तो मानवता आणि बंधुभावाचा सण आहे, अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. या सोहळ्याचे सुंदर क्षण छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपले आहेत. सर्व धर्मीयांच्या उपस्थितीमुळे हा सण खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक ठरला.


### जाहिर प्रगटन

**तहसिलदार मैंथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **वर्षा अशोक पवार रा. वडीगोद्री ता. अंबड** जि. जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|
| | **वर्षा अशोक पवार स्वतः** | ०८/०१/१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२२/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# विमाधारकांनी आपले हक्क जाणून घ्यावेत - धान्नवत

## ग्राहक जागरूकता दिनानिमित्त क्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्समध्ये ड. महेश धान्नवत यांचे व्याख्यान

**आत्ताच एक्सपप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ राष्ट्रीय ग्राहक दिनाचे औचित्य साधून क्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनीच्या वतीने विमा क्षेत्रातील ग्राहक जागरूकता या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ड. महेश एस. धान्नवत यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. विमा पॉलिसीधारकांचे हक्क, विमा कंपन्यांच्या जबाबदाऱ्या तसेच तक्रार निवारणाच्या प्रक्रिया यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला.



व्याख्यानाच्या सुरुवातीला ड. धान्नवत यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, २४ डिसेंबर हा दिवस १९८६ च्या ग्राहक संरक्षण कायद्याच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. जरी २०१९ च्या नव्या कायद्याने त्याची जागा घेतली असली, तरी ग्राहकांचे शोषण रोखणे आणि त्यांना न्याय देणे हा उद्देश आजही कायम आहे. विमा ही एक सेवा असून, त्यात त्रुटी आढळल्यास ग्राहक मंचाकडे दाद मागण्याचा अधिकार प्रत्येक विमाधारकाला आहे.

विमाधारकांचे सहा मूलभूत हक्क

ग्राहक संरक्षण कायद्यानुसार विमाधारकांना मिळणाऱ्या सहा मूलभूत हक्कांची माहिती त्यांनी दिली.

सुरक्षेचा हक्क - दिशाभूल करणाऱ्या विमा उत्पादनांपासून संरक्षण.

माहितीचा हक्क - पॉलिसीच्या अटी, शर्ती, अपवाद व लाभांची संपूर्ण माहिती मिळण्याचा अधिकार.

निवडीचा हक्क - कोणताही दबाव न घेता योग्य पॉलिसी निवडण्याचे स्वातंत्र्य.

मत मांडण्याचा हक्क - विमा कंपनी, खठऊ-ख व ग्राहक मंचांवर आपली बाजू मांडण्याचा अधिकार.

निवारणाचा हक्क - अन्यायकारक निर्णयाविरोधात जिल्हा, राज्य किंवा राष्ट्रीय ग्राहक आयोगाकडे तक्रार दाखल करण्याचा अधिकार.

ग्राहक शिक्षणाचा हक्क - विमा व संबंधित नियमांविषयी जागरूक राहण्याचा अधिकार.

महत्त्वाचे न्यायालयीन निकाल व खठऊ-ख मार्गदर्शक सूचना

ड. धान्नवत यांनी सर्वोच्च न्यायालय व राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या महत्त्वपूर्ण निकालांचा उल्लेख केला. ओम प्रकाश विरुद्ध रिलायन्स जनरल इन्शुरन्स (२०१७) या प्रकरणात केवळ तांत्रिक कारणांवरून विमा दावा नाकारता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तसेच मनजीत सिंग विरुद्ध नॅशनल इन्शुरन्स कंपनी प्रकरणात किरकोळ अटींच्या उल्लंघनावर दावा फेटाळता येत नाही, असा निकाल दिल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी विमा नियामक व विकास प्राधिकरण (IRD-I) च्या मार्गदर्शक सूचनांचाही त्यांनी उल्लेख केला. फ्री-लुक कालावधी ३० दिवसांचा, नामनिर्देशन अनिवार्य करणे आणि दावे ३० दिवसांत निकाली काढणे या तरतुदी विमाधारकांच्या हितासाठी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी नमूद केले.

विमा कंपन्यांची जबाबदारी

विमा कंपन्यांनी पॉलिसीची कागदपत्रे सोप्या व समजण्याजोग्या भाषेत देणे, दावा प्रक्रिया पारदर्शक ठेवणे आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करून देणे बंधनकारक असल्याचे ड. धान्नवत यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात फिट इंडियाचे ब्रँड म्बेसेडर डॉ. कैलाश सचदेव यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला ब्रँच मॅनेजर तुषार ढाले, डेव्हलपमेंट ऑफिसर प्रिया जोशी, ऑपरेशन हेड योगेश अरख, ट्रेनिंग मॅनेजर निलेश देशमाने यांच्यासह कर्मचारी व मोठ्या संख्येने ग्राहक उपस्थित होते. या उपक्रमामुळे विमाधारकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता वाढण्यास मोठी मदत झाली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813